**कृपया प्रसिद्धीसाठी** **15 फेब्रुवारी 2014**

**श्री.राम नाईक, माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि भाजपा नेते यांनी 15 फेब्रुवारी 2014 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत केलेले निवेदन**

***अंतरिम रेल्वे बजेटमध्ये संसदीय नियम व संकेत यांची पायमल्ली : राम नाईक***

**मुंबई, शनिवार :** ''रेल्वे मंत्री श्री. मल्लिकार्जुन खर्गे अंतरिम रेल्वे बजेट - लेखानुदान सादर करत असताना चार मंत्र्यांनी गोंधळ घालून त्यांचे भाषण होऊ न देण्याची अभूतपूर्व गंभीर घटना घडली, परंतु त्याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे रेल्वे मंत्र्यांनी लेखानुदानाच्या भाषणामध्ये संसदीय नियम व संकेत पायदळी तुडविले आहेत'', असे प्रतिपादन माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) व भाजपा नेते श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत एका पत्रकार परिषदेमध्ये केले.

लेखानुदानाच्या प्रक्रियेसंबंधीची अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,''ज्यावेळी सार्वत्रिक निवडणुका जवळ आल्या असतात तेव्हा संपूर्ण अर्थसंकल्प सादर करता येत नाही त्यावेळी लेखानुदानाच्या पद्धतीचे अवलंबन केले जाते. एप्रिल पासून सुरु होणा-या नव्या आर्थिक वर्षातील 2 ते 4 महिन्यांपर्यंतच्या खर्चास संसदेकडून संमती घेतली जाते. त्यासंबंधीचे स्पष्ट नियम आणि संकेत असे आहेत की या लेखानुदानामध्ये कोणतीही 'नवी सेवा' अथवा प्रकल्प घेतले जात नाहीत.'' परंतु रेल्वे मंत्र्यांनी सादर केलेल्या लेखानुदानामध्ये या नियमांची आणि संकेताची सरळसरळ पायमल्ली करण्यात आली आहे. हे लेखानुदान संसदेत मांडण्यापूर्वी मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात येते. त्यामुळे या पायमल्लीला केवळ रेल्वे मंत्रीच नव्हेत, तर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह आणि संपूर्ण मंत्रीमंडळच जबाबदार आहे, अशी टीका श्री. राम नाईक यांनी केली. ''या माझ्या प्रतिपादनाला संसदीय प्रणालीचे गाढे अभ्यासक आणि माजी लोकसभा महासचिव श्री. सुभाष कश्यप यांनीही दुजोरा दिला आहे'', असे श्री. नाईक म्हणाले.

‘‘सादर केलेल्या लेखानुदानामध्ये ‘नवीन सेवा’ या शीर्षकाखाली 17 प्रिमियर रेल्वे गाड्या, 38 एक्सप्रेस गाड्या, 10 पॅसेंजर गाड्या तसेच 7 मेमु-डेमु गाड्या आणि 6 विस्तारीत गाड्यांची घोषणा करण्यात आली आहे. त्याशिवाय 19 नव्या मार्गांचे सर्वेक्षण तसेच पाच दुहेरी मार्गांचे सर्वेक्षण जाहीर करण्यात आले आहे. या घोषणा केवळ नियमबाह्य आहेत एवढेच नव्हे, तर आगामी निवडणुकीवर डोळा ठेवून करण्यात आल्या आहेत. या निंदनीय कृत्याचा निषेध करावा तेवढा थोडाच आहे’’, असेही श्री. नाईक म्हणाले.

संकेतानुसार लेखानुदानामध्ये पूर्वीच्या अर्थसंकल्पाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला जातो. त्यामध्ये मुंबई उपनगरीय रेल्वेचा तर उल्लेखच नाही. खाजगी - सरकारी भागीदारीत चर्चगेट - विरार उन्नत रेल्वे मार्ग करणे, आदी प्रकल्पांसाठी गेल्या रेल्वे बजेटमध्ये एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. याबाबतीतही नेमके काय झाले याचा या लेखानुदानात उल्लेख नाही. तसेच गेल्यावर्षी घोषित केल्याप्रमाणे माल व प्रवासी वाहतुक भाड्यासाठी ‘टेरिफ प्राधिकरण’ का नेमण्यात आले नाही याचाही खुलासा करण्यात आलेला नाही, अशी टीका श्री. नाईक यांनी केली.

रेल्वे मंत्र्यांप्रमाणेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण आणि उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनीही जनतेची दिशाभूल केली आहे. ‘पुणे मेट्रोला मान्यता दिल्याची घोषणा रेल्वे मंत्र्यांनी अंतरिम अर्थ संकल्पात केली आहे’, असे या दोघांनी म्हटले आहे. परंतु पुणे मेट्रोचा उल्लेखच रेल्वे मंत्र्यांच्या संपूर्ण भाषणात कुठेही नाही. ‘‘निवडणुकीकडे डोळे ठेवून दडपून घोषणा करण्याचा हा सवंग प्रयत्न आहे’’, असेही श्री. नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**